# नाशिक महानगरपालिका,नाशिक
## जाहिर प्रगटन

नाशिक महानगरपालिका,नाशिक येथील राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) व माता बालसंगोपन कार्यक्रमांतर्गत शासनाच्या जा.क्र./राकुकका/नियमित लसीकरण/कक्ष-१२/६३५४०-६४२/ दि.०५/११/२०१८ च्या पत्रान्वये, नाशिक शहरातील ९ महिने ते १५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांसाठी माहे डिसेंबर २०१८- जानेवारी २०१९ मध्ये गोवर रुबेला(Measles & Rubella) लसीकरण मोहिम राबविण्यासाठी विस दिवसांकरिता रोजंदारी /Hired पध्दतीने ए.एन.एम.ची पदे रुपये ४५०/-(अक्षरी : चारशे पन्नास रुपये मात्र) प्रति दिवस मानधन या दराने भरावयाची आहेत. करीता, ए.एन.एम. पदाची शैक्षणिक अर्हता धारक असेल त्या उमेदवारांनी शैक्षणिक मुळ कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (झेरॉक्स प्रत) व अर्ज सार्वजनिक आरोग्य विभाग, ३ रा मजला, राजीव गांधी भवन, येथे दि.१४/१२/२०१८ ते दि.१५/१२/२०१८ या कालावधीत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. अर्ज छाननी नंतर उच्च अर्हताधारक व अनुभवी उमेदवारांची अंतीम निवड यादी दि. १८/१२/२०१८ रोजी महानगरपालिकेच्या नोटिस बोर्ड व वेबसाईट www.nashikcorporation.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | जातीचा प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वय | अनुभव | प्रतिदिन मानधन | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ए.एन.एम. | पहिला टप्पा ३०<br><br>दुसरा टप्पा ४० | लागू नाही | १० वी उत्तीर्ण व ए.एन.एम. कोर्स उत्तीर्ण आणि महाराष्ट्र नर्सिंग कौंन्सिलकडे नोंदणी आवश्यक | १८ ते ६० पर्यंत | किमान २ वर्षांचा लसीकरणाचा अनुभव असणे आवश्यक | ४५०/- रुपये | कार्यालयीन कामाचे २० दिवस (दि.१९/१२/२०१८ ते २१/०१/२०१९) सुट्टीचे दिवस वगळून. |

**टिप :-**

वरील पदांच्या कामाचे स्वरुप :- लसीकरण केंद्र (बाहय)/अंगणवाडी/शाळेतील ९ महिने ते १५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांसाठी माहे डिसेंबर २०१८- जानेवारी २०१९ मध्ये गोवर रुबेला (Measles & Rubella) लसीकरण करणे.

**अटी व शर्ती :-**

१. जा.क्र./राकुकका/नियमित लसीकरण/कक्ष-१२/६३५४०-६४२/दि.०५/११/२०१८ च्या पत्रान्वये रोजंदारी पध्दतीने केवळ कार्यालयीन कामांचे विस (२०) दिवसांकरिता नेमणूक राहील.
२. सदरील पदांचा नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेशी अथवा एन.यू.एच.एम./आर.सी.एच. कार्यक्रमांशी कसल्याही प्रकारचा संबंध नाही. वरील सर्व पदे रोजंदारी पध्दतीने शासनाच्या जा.क्र./

राकुकका/नियमित लसीकरण/कक्ष-१२/६३५४०-६४२/ दि.०५/११/२०१८ च्या पत्रान्वये, प्रतिदिन तत्वावर निव्वळ विस(२०) दिवसांकरिता असल्यामुळे ज्या दिवशी शासनाची गोवर रुबेला लसीकरण मोहिम संपेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय रोजंदारी वरील सेवा आपोआप संपुष्टात येईल.

३. उमेदवाराने अर्जासोबत पासपोर्ट साईज फोटो(दोन), जन्म तारखे करीता (वयाचा दाखला, दहावीची सनद/टी.सी./जन्म प्रमाणपत्र), फोटो आय.डी./रहिवाशी प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र (शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका), रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र तसेच उच्च शैक्षणिक अर्हता असल्यास(उदा.बारावी/पदवी/पदव्युतर पदवी) संबंधीत प्रमाणपत्र व इतर आवश्यक मुळ कागदपत्रांच्या स्वयं साक्षांकित प्रतींच्या संचासह (सर्व आवश्यक कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती) व विहित नमुन्यातील अर्ज सादर करावेत. उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभव असल्यास अतिरिक्त गुण प्रदान करण्यात येतील.

४. अर्ज छाननी नंतर उच्च अर्हताधारक व अनुभवी उमेदवारांची अंतीम निवड यादी व प्रतिक्षा यादी महानगरपालिकेच्या नोटीस बोर्ड व वेबसाईट www.nashikcorporation.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

५. उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा खाजगी व राजकिय दबाव आणल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.

६. निवड झालेल्या उमेदवाराने आपली सेवा रोजंदारी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या विस (२०) दिवसांकरिता नियुक्ती असल्याबाबतचा करारनामा देणे बंधनकारक आहे.

७. सदरची रोजंदारी तत्वावरील भरती रद्द करणे अथवा स्थगीत करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो., नाशिक महानगरपालिका,नाशिक यांनी राखून ठेवले आहेत.

८. वरील पदासाठीचा अर्जाचा नमुना, जाहिरात, नाशिक महानगरपालिका, नाशिकच्या नोटीस बोर्ड व www.nashikcorporation.in वेबसाईवर उपलब्ध आहे.

९. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकिची माहिती/प्रमाणपत्र/कागदपत्रे सादर केल्याचे/दिशाभुल केल्याचे अथवा कोणत्याही प्रकारची माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी निवड/नियुक्ती तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

१०. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र/अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही.

११. अनुभवाच्या बाबतीत शासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी संस्था यांचा अथवा राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत असणारा लसीकरणाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

१२. सदरील भरतीस शासनाचे पत्र जा.क्र./राकुकका/नियमित लसीकरण/कक्ष-१२/६३५४०-६४२/ दि.०५/११/२०१८ लागू राहील.

१३. गुणवत्ता व अनुभवानुसार निवड झालेल्या उमेदवारांना रोजंदारी पद्धतीने केवळ वीस (२०) दिवसांकरीता नियुक्ती देण्यात येईल.

**Sd/-**
**आयुक्त**
**नाशिक महानगरपालिका,नाशिक**

# अर्ज

प्रति,
मा. आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

फोटो

1. पदाचे नांव :-
2. उमेदवाराचे नांव :-
3. पत्रव्यवहाराचा पत्ता :-
:-
4. भ्रमणध्वनी :-
5. ई-मेल आय.डी. :-
6. जन्मतारीख :-
7. वय (दि. / /2018 रोजीचे वय) :-
8. लिंग :- स्त्री / पुरूष
9. शैक्षणिक पात्रता

| अ. क्र. | शैक्षणिक पात्रता | परिक्षा मंडळ / विद्यापिठाचे नाव | उतीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |
| 4. | | | | |
| 5. | | | | |

10. अनुभव असल्यास :- तपशील व कालावधी देणे

| अ. क्र. | काम केलेल्यासंस्थेचेनांव | कालावधी वर्षामध्ये | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |
| 4. | | | |
| 5. | | | |

**अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे :-**

1)
2)
3)
4)
5)
6)
7)
8)

ठिकाण :-

दिनांक :- / /2018

उमेदवाराची स्वाक्षरी